Outward No. CRS/ 1317 /20
Office of the Director, C.R.S.
Dr. P.D.K.V., Akola Dated: 29/9/25

# लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत पश्चिम, शिवर व सामान्य विभागाच्या प्रक्षेत्रावरील **सिताफळ** फळबहाराचा जाहीर लिलाव ठरविण्यात आला आहे. सदरचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | विभागाचे नाव | फळ झाडाचे नाव | एकूण झाडे | फळ धारणा झालेली झाडे | जाहीर लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | पश्चिम विभाग | सिताफळ | ९३७ | ९३७ | ०७.१०.२०२५<br>स. १०.३० वा. |
| २ | शिवर विभाग | सिताफळ | १४० | १०३ | |
| ३ | सामान्य विभाग | सिताफळ | १०५० | ९७० | |

वरील प्रमाणे **सिताफळ** फळ बहाराचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्राच्या **सामान्य विभागाच्या कार्यालयामध्ये करण्यात येणार आहे.**

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील फळझाडांची पाहणी करून घ्यावी व लिलावात भाग घेण्याकरिता हजर रहावे. लिलावाच्या अटी व शर्ती मध्यवर्ती संशोधन केंद्राच्या तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेले आहे.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

## जाहीर लिलावाच्या अटी

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत **पश्चिम, शिवर व सामान्य** विभागावरील परिसरातील **सिताफळ** फळबहाराचा जाहीर लिलाव दिनांक ०७.१०.२०२५ रोजी स. १०.३० वा. वाजता **सामान्य** विभागावर करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

- **पश्चिम, शिवर व सामान्य** विभागावरील **सिताफळाच्या** फक्त फळ बहराचा जाहीर लिलावात समावेश आहे.
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये **रु. १०००** नगदी अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी **रु. १०००** अनामत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल. कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही. विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- फळ बहाराची अपेक्षित किमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
- बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला ह्यांचे मंजुरी नंतर हि बोली मान्य अथवा अमान्य असल्याची लिलावाच्या तारखेपासून तीन दिवसाचे आत संबधित ठेकेदार/व्यापारी यास सूचित करणायत येईल.
- लिलावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्या खरेदीदारास त्या बाबतची सूचना मिळाल्यानंतर लिलावाची १००% रक्कम त्वरीत भरावी लागेल.
- अंतिम बोलीच्या १०% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. सदर रक्कम लिलावाच्या अंतिम मुदतीनंतर परत करण्यात येईल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला यांचे कडे राहील.
- फळे तोडून नेण्याची अंतिम तारीख ................................राहील.
- ठेकेदारास विभागावरील फळ बागेतील रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी **पश्चिम, शिवर व सामान्य विभाग** यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- झाडांची रखवाली ठेकेदारास स्वतः करावी लागेल राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला